| नियमित दिवाणी दावा क्र. ६३३/२०२२ मधील निशाणी क्र.०५ वरील आदेश. | MHLA120015172022 |
|---|---|

मुळ कायम मनाईकरीता दाखल केलेला दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील वादीच्या ताबा वहिवाटीमध्ये प्रतिवादी अथवा त्यांच्यातर्फे इतर कोणीही कसल्याही प्रकारचा अडथळा करु नये व इतर प्रकारे हस्तक्षेप करु नये अशी अंतरीम ताकीद मागण्याकरीता प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

**वाद अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२) मौजे निटूर, ता. निलंगा, जि. लातूर मधील जमीन सर्वे/गट नं. ५२६ पैकी ०.५ आर पैकी पुर्व बाजूचे क्षेत्र ० हे. २.५ आर जमीन ज्याच्या चतूःसीमा परिच्छेद क्र.०३ मध्ये नमूद केल्या आहेत. ही वाद मिळकत आहे. (इतपर दावा मिळकत असे संबोधले आहे.)

३) वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबातील व्यक्तीमध्ये वडीलोपार्जित मिळकतीच्या दिनांक १४.०८.२००९ रोजी वाटण्या झाल्या असून, त्या वाटणीप्रमाणे जो–तो आप आपल्या जमिनीवर काबीज आहे. वाद मिळकत ही वादीच्या वाटणीस आली असून तो त्या मिळकतीच्या कब्जात आहे. उरलेली निम्मी मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात आहे. वादीची मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी वादीच्या मिळकतीस हरकत–अडथळा करीत आहे. म्हणून वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. क्रमशः वादीने त्याच्या दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४) प्रतिवादीने निशाणी ३१ वर म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील कथने नाकारली आहेत. दावा मिळकतीमध्ये वादीचा ताबा नाही. तसेच वादी दावा मिळकतीचा मालक नाही. ती मिळकत प्रत्यक्षरीत्या प्रतिवादीच्या ताब्यात आहे. त्या मिळकतीमध्ये पुर्वी विहीर होती. ती विहीर प्रतिवादीने बुजवलेली आहे व त्या ठिकाणी गजराज गवत लावलेले आहे. दिनांक १४.०८.२००९ रोजी कोणतेही लेखी वाटप झालेले नाही. जे वाटणीपत्र दाखल केले आहे, त्या वाटणीपत्रास वादीच्या बहिणी आणि आई पक्षकार नाहीत. वादीचे वडील राघवेंद्र कुलकर्णी सन १९८६ साली मयत झाले आहेत. राघवेंद्र कुलकर्णी यांचे सर्व वारस यांच्यामध्ये वाटणीपत्र झालेले नाही. त्या वाटणीपत्रावर प्रतिवादी आणि त्यांची आई चंपावती कुलकर्णी यांची सही नाही. वाद मिळकतीमध्ये प्रतिवादींची जनावरे बांधण्याची जागा असून त्यामध्ये त्याचे पत्र्याचे शेड आहे असे कथन करुन प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्याची त्याने विनंती केली.

५) वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. के. वलांडे आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एच. व्ही. गायकवाड यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला.

६) अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने माझे विचारात उपस्थित झाले. त्यांचे सकारण निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीची सकृतदर्शनी केस आहे काय? | होय. |
| २. | न्यायाचा तराजु वादीच्या पक्षात आहे काय ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| ३. | मनाई नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**मुद्दा क्र.१** –

७) वादीने वाद मिळकत त्याच्या मालकीची असल्याचे दाखवण्याकरीता दावा मिळकतीचा ७/१२, दिनांक १४.०८.२००९ रोजीचे खरेदीपत्र आणि फेरफार क्र.१३२२ इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. सर्वे क्र.५२६ च्या ७/१२ आणि फेरफार क्र.१३२२ वरुन ० हे. २.५ आर ही जमिन दावा मिळकत वादीच्या नावे असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर प्रतिवादी हा त्याच सर्वे क्र.५२६ मधील ० हे. २.५ आर जमिनीचा मालक असल्याचे दिसून येते. ७/१२ पत्रकावरुन वादी आणि प्रतिवादी यांची अनुक्रमे २.५० आर अशी स्वतंत्र नोंद आहे. दिनांक १४.०८.२००९ रोजीच्या वाटणीपत्राचे अवलोकन करता सदर वाटणीपत्र नोंदणीकृत नसलेतरी सदर वाटणीपत्र लेखी स्वरुपात आहे. ते वाटणीपत्र वादी–प्रतिवादी आणि इतर सहहिस्सेदार यांच्यामध्ये वाटण्या झाल्याचे दिसून येते. वादी–प्रतिवादी हे एकमेकांचे चुलतभाऊ आहे हे उभय पक्षकारांना मान्य आहे. सदर वाटणीपत्रातील पार्टी क्र.१–अ ते १–ए हे शेषराव म्हणजेच प्रतिवादीचे वडील यांचे वारस आहेत. त्यांना सर्वे क्र. ५२६ मधील ५ आर पैकी २.५० आर ही मिळकत वाटपास दिल्याचे दिसून येते. तर पार्टी क्र. २ म्हणून वादीचा त्या वाटणीपत्रामध्ये समावेश आहे. त्यांना

सर्वे क्र. ५२६ मधील २.५० आर इतकी जमीन वाटपास दिलेली आहे. वादी–प्रतिवादींच्या वाटपास आलेल्या मिळकतीच्या चतू:सीमा सदर वाटपामध्ये दिलेल्या आहेत. त्यावरुन वादी–प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप झाल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादीने सदर वाटपपत्रावर सही केल्याचे दिसून येते. वादीच्या आईने सदर वाटपपत्रावर सही केलेली नाही असे असले तरी सदर वाटपपत्राचा अंमल ७/१२ पत्रकी फेरफार क्र. १३२२ ने दिनांक २८.१०.२००९ रोजी झालेला आहे. दिनांक २८.१०.२००९ पासून प्रतिवादीने त्यास आक्षेप घेतलेला नाही. वादीच्या वडीलांचे इतर वारस म्हणजेच वादीच्या बहिणी आणि आई ह्या वाटपपत्रास पक्षकार नसल्यातरी सदर वाटप त्यांनी अमान्य केलेले नाही. प्रस्तूतचा दावा हा निरंतर मनाईकरीता दाखल असून सध्या तात्पुरता मनाई आदेश करीता दाखल असलेल्या अर्जाच्या सुनावणीवेळी आवश्यक पक्षकार हा मुद्दा संबंधीत नाही.

८) तात्पुरता मनाई आदेशाकरीता दाखल असलेल्या अर्जामध्ये वादीचा वाद मिळकतीमधील कब्जा पाहणे आवश्यक आहे. सदर दिनांक १४.०८.२००९ रोजीचे वाटणीपत्र, फेरफार क्र. १३२२ आणि ७/१२ यावरुन सर्वे क्र. ५२६ ही दोन भागांमध्ये विभागलेली असून त्यापैकी पुर्वेकडील निम्मा हिस्सा म्हणजेच वाद मिळकत वादीच्या ताब्यात आहे. आणि उर्वरीत भाग प्रतिवादीच्या ताब्यात आहे हे स्पष्ट होते.

९) प्रतिवादीने सहहिस्सेदाराविरुध्द मनाई आदेश देता येत नाही. वादीस प्रथमदर्शनी केस दिसून येत नाही असा युक्तीवाद केला. परंतू वाटपपत्रावरुन दावा मिळकतीचे विभाजन झाल्याचे दिसून येते. वाद

मिळकतीचे वाटप हे सर्व वारसांमध्ये झालेले नाही असे असेल तर प्रतिवादींनी त्यामधील वाटप मागितलेले नाही किंवा झालेले वाटप हे कायदेशीर नाही म्हणून दिनांक २८.१०.२००९ रोजीपासून आक्षेपही घेतलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या युक्तीवादामध्ये तथ्य आढळून येत नाही. सबब वादीस प्रथमदर्शनी केस आहे असे दिसून येते. दावा मिळकतीचा ७/१२ आणि फेरफारच्या नोंदी यावरुन वादी दावा मिळकतीच्या कब्जात आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणून **मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्र.२ व ३</u> –**

१०) दावा मिळकतीमध्ये वादीची वहिवाट असल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. ती मिळकत वाटणीपत्रा आधारे वादीला मिळालेली आहे. ती मिळकत वादीच्या मालकीची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादीची नोंद आहे. प्रतिवादीने ती सर्व मिळकत त्याच्या एकट्याच्या ताब्यात आहे असे कथन केले आहे. वादीच्या वहिवाटीस प्रतिवादीने हरकत करत आहेत हे त्यांनी दाखल केलेल्या कैफियतीमधील कथनांवरुन दिसून येते. त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीमधील हक्कांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने आहे. दावा मिळकतीमधील वादीच्या वहिवाटीचे संरक्षण न केल्यास वादीचे नुकसान होईल. सदर आदेशाने प्रतिवादीचे नुकसान होईल अशी परिस्थिती दिसून येत नाही. **म्हणून मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.**

**मुद्दा क्र.४ः–**

११) मुद्दा क्र.१ ते ३ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे वादीला सकृतदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. तसेच प्रतिवादीचे अपरिमीत नुकसान होईल अशी परिस्थितीही नाही. तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास वादीचे नुकसान होईल असे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त स्थिती विचारात घेता अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज (निशाणी ०५) अर्ज **मंजुर** करणेत येत आहे.

२. प्रतिवादीने दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहिवाटीस स्वतः अगर तिऱ्हाईत इसमांमार्फत हरकत, अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई आदेश देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत अंतिम निकालावेळी आदेश.

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.07.29 14:56:27 +0530

**(श्रीमती ए. एस. गुंजवटे)**

**दिनांक :– २९.०७.२०२५.** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, निलंगा.**

**ठिकाण :– निलंगा.** **जिल्हा लातूर.**